वाचा :- १. महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय यांचा शासन निर्णय क्र. संकिर्ण-१०.०१/३०५४/प्र.क्र. २१/२००२/२९ दिनांक १६.०१.२००३.

२. कार्यासन अधिकारी, सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय मुंबई यांचे पत्र क्र. सीएलजी-२००३/प्र.क्र.१३८/प्रशासन-४ दि. १४.०१.२००४.

३. महाराष्ट्र राज्य यंत्रमाग महामंडळ मर्यादित मुंबई यांचे परिपत्रक क्रमांक कापड पुरवठा / यंत्रमाग कापड (हातमाग कापडाशिवाय),बेडशिट, पिला कव्हर व ब्लॅंकेट, चादर,गादी,उशी इत्यादी बाबींची नियतकिंमत / दरपत्रक / २०२३-२४/ ७२ / दि. ०९.०५.२०२३

---

# प रि प त्र क

क्रमांक :- रा.अ./आस्था-१२/गणवेष/०४/सन-२०२३-२४/ब - 09 मुंबई, दिनांक 09/02/2024

विषय :- वस्तू व सेवा कर विभागातील चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांना गटवर्ष २०२४-२५ करीता गणवेष पुरविणे तसेच संबंधित कर्मचाऱ्यांनी गणवेष परिधान करणेबाबत.

संदर्भ क्रमांक १ च्या शासन निर्णयानुसार राज्य शासकिय चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांना सफेद रंगाचा टेरीकॉटचा गणवेष पुरविण्यास शासनाने मान्यता दिलेली आहे. तसेच संदर्भ क्रमांक २ च्या शासनाच्या पत्रानुसार कोणत्या पदांकरीता कोणत्या रंगाचा गणवेष पुरविण्यात यावा, याबाबतच्या सूचना दिलेल्या आहेत. त्याअनुषंगाने वस्तू व सेवा कर विभागातील चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांना गटवर्ष २०२४-२५ (दि.०१.०१.२०२४ ते दि. ३१.१२.२०२५) या कालावधीकरीता खाली नमूद करण्यात आल्याप्रमाणे गणवेषाचा पुरवठा करावयाचा आहे.

| अ.क्र. | कर्मचारी | पदनाम | गणवेष कापडाचा प्रकार |
|---|---|---|---|
| १ | पुरुष कर्मचारी | शिपाई<br>दारवान<br>सहाय्यक दारवान<br>उद्वाहक<br>मुकादम<br>मुख्य-स्वच्छक<br>मुख्य सफाईगार<br>आग पहारेकरी | सफेद रंगाचा गणवेष कापड. |
| २ | पुरुष कर्मचारी | स्वच्छक | खाकी रंगाचा गणवेष कापड |
| ३ | पुरुष कर्मचारी | सफाईगार | नेव्ही ब्ल्यू रंगाचा गणवेष कापड |
| ४ | महिला कर्मचारी | स्वच्छक / सफाईगार / शिपाई | आकाशी निळया रंगाची व काळी किनार असलेली साडी. |

सदर गणवेषाचा पुरवठा आपल्या कार्यालयातील गणवेष पात्र चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांना करावयाचा असून शासन निर्णय उद्योग, उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्र. भांखस-२०१४/प्र.क्र.८२/भाग- III/ उद्योग-४ दिनांक ०१.१२.२०१६ मधील परिच्छेद ५.१७, परिशिष्ट २० (६) नुसार सदर गणवेषाचे कापड महाराष्ट्र राज्य यंत्रमाग महामंडळ मर्यादित मुंबई यांच्याकडून खरेदी करणे आवश्यक आहे.

सद्यस्थितीत गट वर्ष २०२४-२५ करीता गणवेष कापडाची खरेदी करावयाची असून सदर खरेदी मे. महाराष्ट्र राज्य यंत्रमाग महामंडळ मर्यादित या संस्थेकडून संदर्भ क्र. ३ अन्वये उद्योग संचालनालय, मध्यवर्ती भांडार खरेदी संघटना, यांचे परिपत्रक क्रमांक कापड पुरवठा / यंत्रमाग कापड (हातमाग कापडाशिवाय),बेडशिट, पिला कव्हर व ब्लॅकेट, चादर,गादी,उशी इत्यादी बाबींची नियतकिंमत / दरपत्रक / २०२३-२४/ ७२ / दि. ०९.०५.२०२३ मध्ये निश्चित करण्यात आलेल्या दरानुसार करावयाची आहे. चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांना पुरविण्यात येणाऱ्या गणवेष कापडाचा दर्जा व रंग यामध्ये कोणतीही तफावत येऊनये तसेच परिशिष्ट 'ब' प्रमाणे गणवेष कापडाची खरेदी करण्यात यावी. याकरीता संबंधित संस्थेस मागणीपत्र सादर करुन गणवेष कापड तयार करुन घेणे सोईस्कर होणार आहे. त्याअनुषंगाने मुंबई मधील सर्व राज्यकर सहआयुक्त यांनी त्यांचे विभागात कार्यरत असलेल्या गणवेष पात्र असलेल्या चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांची तसेच मुंबई बाहेरील सर्व राज्यकर सहआयुक्त यांनी त्यांच्या संपूर्ण विभागात (स्वतःचे कार्यालय व त्यांच्या अधिपत्त्याखालील कार्यालये) कार्यरत असलेल्या चतुर्थश्रेणी गणवेष पात्र असलेल्या कर्मचाऱ्यांना पुरविण्यासाठी आवश्यक असणाऱ्या कापडाची खरेदी त्यांच्या कार्यालयामार्फत दिनांक-३१.१२.२०२५ पर्यंत वर नमूद केलेल्या संस्थेकडून करावयाची आहे. मा.राज्यकर आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई व मा. विशेष राज्यकर आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई तसेच सुरक्षा व जनसंपर्क अधिकारी माझगांव व राज्यकर सहआयुक्त कार्यालय, नोडल १३, बांद्रे या कार्यालयांच्या अधिपत्त्याखालील चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांना गणवेष खरेदी राज्यकर अधिकारी (आस्थापना-१२) यांच्यामार्फत कापडाची खरेदी करण्यात येईल. सदर खरेदीसाठी होणारा खर्च संबंधित संस्थेने मालाचा पुरवठा करुन त्याकरीताचे देयक सादर केल्यानंतर राज्यकर सहआयुक्त यांनी त्यांना प्रदान करण्यात आलेल्या वित्तिय अधिकारात सन २०२३-२४ किंवा सन २०२४-२५ या वित्तिय वर्षात 'कार्यालयीन खर्च' या शिर्षाखाली उपलब्ध झालेल्या अनुदानातून भागविण्यात यावा.

या कार्यालयाच्या असेही निदर्शनास आले आहे की, वस्तू व सेवा कर विभागातील चतुर्थश्रेणी कर्मचारी कार्यालयीन वेळेत पूर्ण गणवेष परिधान करीत नाहीत. तसेच याबाबत दिलेल्या सूचनांचे ते पालन करीत नाहीत, यामुळे इतर चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांच्या शिस्तीवर याचा विपरीत परिणाम होतो, ही बाब कार्यालयीन शिस्तीच्या दृष्टीने योग्य नाही. सबब सर्व कार्यालय प्रमुखांना असे कळविण्यात येते की, त्यांनी त्यांच्याकडे कार्यरत असलेले चतुर्थश्रेणी कर्मचारी पूर्णवेळ गणवेष परिधान करतील याची दक्षता घ्यावी. याप्रमाणे जर एखादा चतुर्थश्रेणी कर्मचारी गणवेष परिधान करण्यास कसूर करीत असेल तर त्यांच्यावर खालीलप्रमाणे कारवाई करावी.

१. सदर कर्मचाऱ्यांस देण्यात येणारा धुलाई भत्ता प्रदान करण्यात येऊ नये.

२. सदर कर्मचाऱ्यांवर आवश्यक असल्यास शिस्तभंगाची कारवाई करावी.

उपरोक्त सूचनांचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे.

सोबत :- १) परिशिष्ट 'ब'

(नितीन चं.शालिग्राम)
राज्यकर सहआयुक्त (मुख्यालय-२),
महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रत माहितीकरीता व योग्य त्या कार्यवाहीकरीता.

१. अपर राज्यकर आयुक्त, पुणे / ठाणे / नागपूर,नाशिक, कोल्हापूर.
२. राज्यकर सहआयुक्त, मुं.वि.का. / व्यवसायकर / मोठे करदाते कक्ष (१ ते ४) /सीमा तपासणी नाके/ अन्वेषण अ,ब,क मुंबई.
३. राज्यकर सहआयुक्त, नोडल १ ते १३.
४. राज्यकर सहआयुक्त(प्रशा,अपिले,व व्यवसायकर), ठाणे शहर / ठाणे ग्रामिण /रायगड/ पुणे / नाशिक / कोल्हापूर /सोलापूर / धुळे / अमरावती / औरंगाबाद / नांदेड / नागपूर.
५. आस्थापना अधिकारी (आस्था-११), विशेष राज्यकर आयुक्तांचे कार्यालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
६. आस्थापना अधिकारी, राज्यकर आयुक्तांचे कार्यालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
७. निवड नस्ती.
८. स्थळप्रत.

## परिशिष्ट 'ब'

| अ.क्र. | पदनाम | गणवेष कापड प्रकार | तीन जोडी याप्रमाणे | टेरीकोट कापडाची प्रत | कापडाची रुंदी | दर प्रती मिटर |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | **पुरुष कर्मचारी**<br>शिपाई<br>उदवाहक<br>सहायक दारवान<br>मुकादम<br>मुख्य स्वच्छक<br>मुख्य सफाईगार<br>आग पहारेकरी | **शर्ट पीस**<br>सफेद गणवेष कापड<br>(पॉलिस्टर) | २ X ३ = ६ मिटर | टेक्स व्हिसकॉस शर्टींग<br>पॉलिस्टर ८०%<br>व्हिसकॉस २०% | ८९ सें.मी. | ८८.०० |
| | | **पँट पीस**<br>सफेद गणवेष कापड<br>(पॉलिस्टर) | १.३० X ३ = ३.९० मिटर | पॉलिस्टर व्हिसकॉस सुटींग<br>(मेटी) पॉलिस्टर ६७%<br>व्हिसकॉस ३३% | १४८ सें.मी. | २४८.०० |
| २ | स्वच्छक | **शर्ट पीस**<br>खाकी गणवेष कापड<br>(पॉलिस्टर) | २ X ३ = ६ मिटर | टेक्स व्हिसकॉस शर्टींग<br>पॉलिस्टर ८०%<br>व्हिसकॉस २०% | ८९ सें.मी. | ८८.०० |
| | | **पँट पीस**<br>खाकी गणवेष कापड<br>(पॉलिस्टर) | १.३० X ३ = ३.९० मिटर | पॉलिस्टर व्हिसकॉस सुटींग<br>(मेटी) पॉलिस्टर ६७%<br>व्हिसकॉस ३३% | १४८ सें.मी. | २४८.०० |
| ३ | सफाईगार | **शर्ट पीस**<br>नेव्ही ब्ल्यु गणवेष कापड<br>(पॉलिस्टर) | २ X ३ = ६ मिटर | टेक्स व्हिसकॉस शर्टींग<br>पॉलिस्टर ८०%<br>व्हिसकॉस २०% | ८९ सें.मी. | ८८.०० |
| | | **पँट पीस**<br>नेव्ही ब्ल्यु गणवेष कापड<br>(पॉलिस्टर) | १.३० X ३ = ३.९० मिटर | पॉलिस्टर व्हिसकॉस सुटींग<br>(मेटी) पॉलिस्टर ६७%<br>व्हिसकॉस ३३% | १४८ सें.मी. | २४८.०० |
| ४ | **महिला कर्मचारी**<br>स्वच्छक<br>सफाईगार<br>शिपाई | **साडी**<br>आकाशी निळया रंगाची व काळी किनार असलेली<br>(पॉलिस्टर) | **सहावारी**<br>५.५० X ३ = १६.५० मिटर<br>**नउवारी**<br>८.२५ X ३ = २४.७५ मिटर | टेरीकॉट साडी<br>६७% पॉलिस्टर<br>३३% कॉटन | ११८ सें.मी. | १००.०० |
| | | **ब्लाउज**<br>आकाशी निळया रंगाचा<br>(पॉलिस्टर) | ८० X ३ = २४० सें.मी. | ८० DN Micra | ८९ सें.मी. | १०५.०० |